# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १३६ वा बुधवार दि.१८ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# महाराष्ट्र बनतोय ड्रग्जचे हब?

मुंबई : गेल्या आठवडाभरात महाराष्ट्रात विविध ठिकाणी अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. मुंबई पोलीस, अंमली पदार्थ विरोधी सेल आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो या सर्व विभागांनी मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज जप्त केले असून अनेक आरोपींना अटक करण्यात यश मिळवले आहे. गेल्या आठवडाभरात नाशिक, सोलापूर आणि पुण्यात औषध कारखान्यांचा पर्दाफाश झाला आहे. राज्याच्या या जिल्ह्यातून ४५० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आणि डझनभर आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामुळे अशा परिस्थितीत महाराष्ट्र ड्रग्जचे हब बनत चालला आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारात अचानक वाढ झाली आहे. अमली पदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई केली जात आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ सापडल्यामुळे अनेक प्रश्नही उपस्थित होत आहेत. मुंबई पोलिसांच्या साकीनाका पोलिसांनी नाशिक एमआयडीसीतील एका कारखान्यावर छापा टाकून सुमारे दीडशे किलो ड्रग्ज जप्त केले. या प्रकरणाची सुरुवात १० ग्रॅम जप्तीपासून झाली, ज्यामध्ये नाशिकमधील औषध निर्मिती कारखान्यावर छापा टाकून सुमारे १५० किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आला, ज्याचे बाजार मूल्य ३०० कोटी रुपये आहे.

त्यानंतर एनसीबीने पुण्याच्या जंगलातील दोन लॅबवर छापा टाकून सुमारे दोनशे किलो ड्रग्ज जप्त केले. छाप्यात सुमारे २०० किलो अल्प्रोझम सापडले आहेत. याशिवाय मोठ्या प्रमाणात कच्चा मालही जप्त करण्यात आला आहे. यासोबतच अंमलीपदार्थांविरुद्धच्या कारवाईत मुंबई पोलिसांच्या अँटी नार्कोटिक्स सेलकडूनही सातत्याने अमली पदार्थ जप्त करून तस्करांना अटक करण्यात येत आहे. विशेष म्हणजे छापा टाकलेल्या ठिकाणी हायटेक प्लांट्स सापडत आहेत.

सोलापुरात कारवाई

मुंबई क्राईम ब्रँचने सोलापूरच्या चिंचोली एमआयडीसीमधील एका कारखान्यातील तीन ड्रग मॅन्युफॅक्चरिंग लॅबमधून मोठ्या प्रमाणात ड्रग्ज आणि कच्चा माल जप्त केला आहे. मुंबईचे डीसीपी क्राईम राज तिलक रोशन यांनी सांगितले की, सुमारे ८ किलो तयार एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. तसेच ५० ते ६० किलो अर्ध-प्रक्रिया केलेले एमडी आढळून आले. तयार औषधांची किंमत सुमारे १६ कोटी रुपये असून अर्ध-प्रक्रिया केलेल्या औषधांची किंमत १०० कोटी रुपये आहे.



रुग्णालयातून अंमली पदार्थांचा व्यवसाय

अमली पदार्थांविरोधातील कारवाई वाढली असली तरी पुण्यातील अमली पदार्थ तस्कर ललित पाटीलच्या कारनाम्याने कारागृह आणि पोलीस प्रशासनाला वेठीस धरले आहे. अटकेनंतरही आधी तुरुंगात राहण्याऐवजी ललित पाटील ९ महिने ससून रुग्णालयात राहून अंमली पदार्थांचा व्यवसाय करत होता, हे रहस्य उघड झाल्यावर तो पोलिसांना चकमा देऊन रुग्णालयातून पळून गेला आणि अद्यापही पकडला गेला नाही.

## आशिव येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार आरोग्य शिबीरात पंधराशे रुग्णांची तपासणी......

औसा - मतदारसंघातील विकास कामाबरोबर प्राधान्याने आरोग्य व शिक्षणाला प्राधान्य देण्यात येईल यासाठी मतदारसंघातील १४ सर्कलमध्ये मोफत सर्वरोग निदान व उपचार आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असून याव्दारे आरोग्य तपासणी, औषधोपचार व गंभीर आजार आढळलेल्या रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येतील याचबरोबर शिक्षणाच्या बाबतही विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले ते क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या माध्यमातून तसेच इंद्रेस/हौसर आणि महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या मदतीने (दि.१७) रोजी औसा तालुक्यातील आशिव येथे आयोजित आरोग्य शिबीरात बोलत होते.



या शिबिरात १५०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी चे इंद्रेस/हौसर चे एमडी मंगेश देसाई, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे सचिव सुहास पाचपुते, बाजार समिती संचालक रमेश वळके पाटील, सरपंच सौ कोमल रमेश वळके, उपसरपंच सौ वैशाली लक्ष्मण दुधभाते,भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, सुनील उटगे, विकास नरहरे, युवराज बिराजदार, प्रा सुधीर पोतदार, युवराज पाटील, संजय कुलकर्णी,धनराज परसणे, माजी सरपंच गोविंद मदने, बी के माने, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी सावंत, प्रविण कोपरकर, चंद्रकांत ढवण, निळकंठ शिंदे, विष्णू कोळी, बाबासाहेब पाटील, नामदेव माने, विनोद जगताप, नामदेव काकडे, लक्ष्मण दुधभाते, मनोज दुधभाते, मनोज लोखंडे, पिरपाशा शेख, महादेव जाधव, सतीश बनसोडे, धनराज घोडके, दीपक बंडगर, सुनील सावंत, श्रीनिवास मदने, कुमार काकडे, पवन माने, गोविंद पवार, युवराज पाटील, अमर पवार, संतोष हलकरे, श्रीनिवास गोरे, माधव सुर्यवंशी, विठ्ठल पवार, उमाकांत चव्हाण, मोहन कावळे, बाजीराव जाधव, अमोल चेंडके, काकासाहेब भोसले, मुख्याध्यापक गरड, महादेव पवार, सचिन वळके, राजेश वळके, शिवम पटने, गोविंद जगताप, मारुती लोभे, श्रीनिवास मदने आदी उपस्थित होते. या शिबिरात गंभीर आजरपण आढळलेल्या रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहेत.शिबिरासाठी आलेले वैद्यकीय चमू, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कर्मचारी, शिक्षक, शिक्षिका कर्मचारी, स्काऊट गाईड चे स्वयंसेवक यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

## पानगाव येथे हैदराबाद - संभाजीनगर रेल्वेला आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून थांबा

लातूर :- रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील रेल्वे स्थानकातून जलद गतीने धावणाऱ्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील यांच्याकडे ९ ऑक्टोबर रोजी दिल्ली दौऱ्यात केली होती. सदरील मागणीची दखल घेऊन संभाजीनगर - हैदराबाद - संभाजीनगर या एक्स्प्रेस रेल्वेला पानगाव रेल्वे स्थानकावर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने नुकताच घेतला आहे.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिल्ली येथे ९ ऑक्टोबर सोमवार रोजी भेट घेऊन रेल्वे प्रवाशांच्या आडी-अडचणी बाबत सविस्तर चर्चा केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी नागपूर नंतर केवळ रेणापूर तालुक्यातील पानगाव येथेच आहेत. या अस्थिच्या दर्शनासाठी महाराष्ट्रभरातून अनुयायी मोठ्या संख्येने पानगाव येथे येत असल्याने त्याचबरोबर दुरवरचा प्रवास करणा-या प्रवाशांसाठी पानगाव येथील रेल्वे स्थानकावरून जलद गतीने धावणाऱ्या हैदराबाद संभाजीनगर यासह सर्वच रेल्वेंना थांबा देऊन होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी केली होती.



आ. रमेशअप्पा कराड यांच्या मागणीची दखल घेऊन रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना केल्या होत्या. त्यानुसार हैदराबाद- संभाजीनगर -हैदराबाद रेल्वेला पानगाव रेल्वे स्थानकावर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने १६ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या पत्रानुसार घेतला आहे. गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेली हैदराबाद संभाजीनगर हैदराबाद या रेल्वेचा थांबा कोरोना काळापासून बंद करण्यात आला होता. आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे सदर रेल्वेला पुन्हा थांबा देण्याचा निर्णय झाल्यामुळे पानगाव आणि परिसरातील रेल्वे प्रवाशांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

संभाजीनगर - हैदराबाद - संभाजीनगर या एक्सप्रेस रेल्वेला पानगाव रेल्वे स्थानकावर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतल्याबद्दल रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील, भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड आणि खा. सुधाकर शृंगारे यांचे पानगाव आणि परिसरातील भाजपाचे अनंत चव्हाण, सतिश अंबेकर, सुकेश भंडारे, गोपाळ शेंडगे, भागवत गिते, अमर चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, सुंदर घुले, शिला आचार्य, मारुती गालफाडे, गणेश तुरुप, रमाकांत संपते, माधव घुले, रमेश केंद्रे, प्रकाश गालफाडे, माधव गुडे, संतोष तुरुप, दिगंबर येडले, नवनाथ पांचाळ, जयराम जाधव, बाबुराव कस्तूरे, सतिश कुलकर्णी, दत्ता अंबेकर, रफीक शेख, अविनाश कुरे, शिवाजी जाधव, नाथराव गिते, विरेंद्र चव्हाण यांच्यासह अनेकांनी आभार व्यक्त केले.

# भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्षा पदी -शोभाताई कांबळे यांची निवड, वाढदिवसाची सदिच्छा भेट

नवी मुंबई / के एच. हनवते :-The Buddhist society of India अर्थात भारतीय बौद्ध महासभा, नेरूळ शाखेच्या अध्यक्षा व नुकतीच भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष पदी निवड झाली अशा आपल्या सर्वांच्या सुपरिचित केंद्रीय शिक्षीका - सदा चेहर्यावर हास्यस्मित व स्वभावाने शांत आणि संयमी पणा, आणि त्यांच्या आंगी स्वाभीमानी बाना आयुनी - शोभाताई बबन कांबळे यांचा ५२ वाढदिवस त्यांच्या नेरूळ येथील रहात्या घरी आगदी साध्या पध्दतीने साजरा करण्यात अला. व त्यांना ऊपस्थितांनी पुढील धम्म कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. सदा हसमुख व शांत आणि संयमी स्वभाव आसनाऱ्या आमच्या ताईसाहेबांना वाढदिवसाच्या लाख लाख हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा हौसला वाढवला. ताईसाहेबांना शुभेच्छा देण्यासाठी कोपरखैरणे येथुन समता सैनिक दल भिमकन्या व जुईनगर येथील केंद्रीय शिक्षक व बौद्धचार्य व तसेच नेरुळमधील धम्म उपासक / उपासीका यांनी उपस्थित राहून ताईसाहेबांना मनभरून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा पर्यटन सचिव - विनोद पाचपिंडे (गुरूजी), बौद्धाचार्य - कल्याणराव हनवते यांनी उपस्थित



रहावून शुभेच्छा दिल्या. भारतीय बौद्ध महाभा कार्यकारणी आयुनि ज्योतीताई जाधव, आयुनि. चांदणी पाचपिंडे, आयुनि. छायाताई दिवे, आयुनि. अनिता अहिरे, आयुनि मंगल ताई सुर्वे, आयुनि. विध्या ताई बनसोडे, आयुनि. विमल ताई डोंगरे, इत्यादी महीला पदाधिकारी उपस्थित होते.

## व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर (जिमाका) : सामाजिक न्याय विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये मुलांची १३ व मुलींचे १२असे एकुण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सदर वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया यावर्षी ऑनलाईन पध्दतीने होत असून व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी २० सप्टेंबर, २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि काही व्यावसायिक अभ्यासक्रमाचे महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरण्यासाठी ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

अर्ज भरण्यासाठी http://www.hostel.mahasamajkalyan.inया लिंकचा वापर करुन २० सप्टेंबर, २०२३ व त्यानंतर केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज भरु शकतात.

तेंव्हा शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी उपरोक्तप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी वरील लिंकचा वापर करुन तसेच स्थानिक गृहप्रमुख अथवा गृहपाल यांचेकडे संपर्क साधून ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त एस.एन.चिकुर्ते यांनी केले आहे.




## संपादकीय....


# पोरखेळच!

राज्यातील सत्तासंघर्षात कळीचा मुद्दा ठरलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रतेबाबतच्या सुनावणीवरून शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने आपला संताप व्यक्त करताना 'काय पोरखेळ लावलाय?' असा सवाल उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालयाचा हा संताप आमदारांच्या अपात्रता सुनावणीस व निर्णयास होणारा विलंब याबाबत होता. मात्र, सध्याच्या घडीला महाराष्ट्रात सत्ताकारण व राजकारणाच्या नावावर जे काही डाव-प्रतिडाव, आरोप-प्रत्यारोप, कुरघोड्या आदी तमाशा सत्ताधारी व विरोधक रंगवतायत ते पाहता राज्यातले राजकारण म्हणजे पोरखेळच बनल्याची जनतेची पक्की भावना बनली आहे. राज्यातला शेतकरी लहरी पावसाच्या तडाख्याने त्रस्त आहे. अर्ध्यावर राज्यात अपुरा पाऊस झाल्याने ऑक्टोबर महिन्यातच दुष्काळाची छाया गडद झाली आहे.आतापासूनच राज्यातील शेकडो गावांना पाणीटंचाई भेडसावत आहे. पावसाने प्रचंड मोठा खंड दिल्याने शेती उत्पादनात प्रचंड मोठी तूट येते आहे. शिवाय अपुरा पाऊस झाल्याने रबी हंगाम कसा घ्यायचा? ही शेतक-यांसमोरची विवंचना आहे. दुसरीकडे सामान्य व गरिबांचा एकमेव आधार असणा-या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली जात आहेत. नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या मोठ्या शहरांतल्या शासकीय रुग्णालयांमध्ये औषधींचा तुटवडा, अपु-या सोयीसुविधा, अपुरे मनुष्यबळ आदी कारणांनी हकनाक शेकडो बळी जात आहेत. सरकार कर्मचारी भरतीच्या नावावर कंत्राटी भरतीचा फंडा काढून राज्यातील शासकीय नोकरीचे स्वप्न पाहून त्यासाठी वर्षानुवर्षे कठोर मेहनत घेत असलेल्या तरुणाईचे स्वप्नच चिरडून टाकते आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आल्याने मराठा समाज व ओबीसींमध्ये संघर्ष उफाळण्याची स्थिती निर्माण झाली आहे. धनगर आरक्षणावरून आदिवासी समाज व धनगर समाज एकमेकांसमोर उभे राहिल्याचे चित्र आहे. एकंदर सामाजिक अस्वस्थता वाढली आहे व या अस्वस्थतेचा कुठल्याही क्षणी स्फोट होईल, अशीच स्थिती आहे. महागाईचा दर कमी झाल्याचे आकडे सरकार देत असले तरी प्रत्यक्षात सामान्य जनता महागाईत होरपळत आहे.

राज्यात गुंतवणुकीच्या मोठमोठ्या घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्षात बेरोजगारी कमी होण्याचे नाव घेत नाही. एकंदर राज्य असे चोहोबाजूने संकटात असताना सत्ताधारी व विरोधक मात्र जनतेला वा-यावर सोडून आपापल्या राजकीय शिमग्यात व्यस्त आहेत. त्यामुळेच राज्यातील राजकारणाचा व सत्ताकारणाचा पुरता पोरखेळच झाल्याची स्थिती आहे आणि हीच भावना सामान्यांमध्ये दृढ होत चालली आहे. राष्ट्रवादीचा गट अजितदादांच्या नेतृत्वाखाली शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाल्यावर सरकारमध्ये सामील तीन पक्षांच्या आमदार-मंत्र्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आणि आता या अस्वस्थतेचे रूपांतर धुसफुशीत झाले आहे. जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सरकारला वेळच नाही कारण सरकारमधील जो-तो मिळालेली खुर्ची सांभाळण्यात वा मिळाली नसली तर ती कशी मिळवता येईल या विवंचनेत आहे. त्यामुळेच सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार रखडला आहे आणि त्याबाबत फक्त 'तारीख पे तारीख' असाच प्रकार सुरू आहे. हे झाले सत्तेत बसलेल्यांचे! तर विरोधात बसलेल्यांना अद्याप भाजपाच्या पक्ष फोडाफोडी करून तो 'हायजॅक' करण्याच्या खेळ्यांच्या धक्क्यातून सावरताच आलेले नाही. उद्धव ठाकरे व शरद पवार या दोन्ही बड्या नेत्यांना आपला पक्ष कसा वाचवायचा हीच चिंता आहे. त्यामुळे जनतेच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरण्यापेक्षा आपल्या पूर्वाश्रमीच्या सहका-यांना अडचणीत आणणे, त्यांच्यावर तोंडसुख घेणे हे विरोधी पक्षनेते म्हणवणा-यांना जास्त प्राधान्याचे वाटते. यातून जनतेचे प्रश्न, समस्या, विवंचना अक्षरश: अडगळीतच पडल्या आहेत. त्यात आमदार अपात्रता हा मुद्दा सर्वच राजकीय पक्षांसाठी कळीचा ठरणे साहजिकच! मात्र, तिथेही पोरखेळच सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देऊनही ही सुनावणी जास्तीत जास्त कशी लांबवता येईल हाच प्रयत्न होतो आहे. विधानसभा अध्यक्षांकडून आपल्या विरोधातच निर्णय येण्याची दाट शंका असल्याने यावर सर्वोच्च न्यायालयातच निर्णय व्हावा अशी ठाकरे व पवार गटाची धडपड दिसते आहे. तर हा निर्णय किमान लोकसभा निवडणुकीपर्यंत तरी लांबावा ही सत्तेत सहभागी गटांची व भाजपचीही धडपड दिसते आहे. त्यानंतर निर्णयापूर्वीच विधानसभा विसर्जीत करून विधानसभा निवडणुकीस सामोरे जायचे व अपात्रता प्रकरणच कालबा करायचे, अशी सत्ताधा-यांची चाल असू शकते. तशी शंका ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी सुनावणी दरम्यान व्यक्त केली व सर्वोच्च न्यायालयालाही ती पटलेली दिसते. तसे घडल्यास ठाकरे गट व शरद पवार गट यांना निवडणुकीत मतदारांची जी सहानुभूती मिळू शकते ती मिळणार नाही. शिवाय पक्ष व पक्षचिन्हही गमावून निवडणुकीला सामोरे जावे लागेल.त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी व निर्णयास होत असलेल्या विलंबामुळे तीव्र संताप व्यक्त करताना विधानसभा अध्यक्षांना खडे बोल सुनावले. निर्णयासाठी पुढील निवडणुकीची वाट पहात आहात का? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला व कालबद्ध निर्णय घ्या, अशी तंबी दिली. त्यावर नार्वेकर यांनी संयत प्रतिक्रिया देताना न्यायालयाचा अनादर होणार नाही असे सांगितले असले तरी संविधानिक तरतुदी, नियम आणि विधिमंडळाचे सार्वभौमत्व लक्षात ठेवूनच निर्णय घेतला जाईल, असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाच्या ताशे-यांवर अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केलाच तर उद्या तो योग्य आहे का? हा प्रश्न जोरकसपणे उपस्थित केला जाईलच व थेट न्यायालयाशी संघर्षाची तयारी केली जाऊ शकते. लोकसभा निवडणुकीपूर्वी या प्रकरणाचा निकाल काही झाले तरी येऊ नये, हीच भाजपची इच्छा स्पष्ट आहे व त्यासाठी भाजप कुठलेही पोरखेळ करण्यास अजिबात कचरणार नाही हे स्पष्ट आहे, हे मात्र निश्चित! या सगळ्या राजकीय कुरघोड्या व डावपेचांमध्ये जनतेच्या प्रश्नांना मात्र कोणी वालीच राहिलेला नसल्याने हा पोरखेळ उघड्या डोळ्यांनी बघण्याशिवाय जनतेला पर्याय नाही.

# कंत्राटी भरती धोकादायक!

राज्य सरकारने सेवा पुरवठादार संस्थांची निवड करून बा यंत्रणेच्या (आऊटसोर्सिंग) माध्यमातून भरतीचा धडाका सुरू केला आहे. आतापर्यंत चार विभागांतील ११ हजार २०३ जागांवर कंत्राटी भरतीचे निर्णय जाहीर झाले असून नोव्हेंबरपर्यंत याच पद्धतीने एक लाख पदे भरण्यात येतील, असे सांगितले जात आहे. राज्य सरकार २, ३ आणि ४ च्या १८६ संवर्गातील सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरणार आहे. राज्यातील तरुणाईचा या निर्णयाला विरोध असून शासन निर्णयाची होळी केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील २३२६ पदे बा यंत्रणेच्या माध्यमातून भरली जाणार आहेत. कंत्राटी भरतीवरून विरोधकांनी रान उठविले असले तरी सरकार माघार घेण्यास तयार नाही. अनेक विभागांमध्ये कंत्राटी भरती सुरू करण्यात आली आहे. मुंबई आयुक्तालयाच्या आस्थापनेवर तीन हजार मनुष्यबळ भरण्याच्या निर्णयाला गुरुवारी मान्यता देण्यात आली. राज्य सुरक्षा महामंडळाकडून ११ महिन्यांसाठी ही भरती करण्यात येणार आहे. पोलिस दलाचे खासगीकरण करण्याचे हे पाऊल असल्याची टीका विरोधकांनी केली. मुंबई पोलिस दलात ११ महिन्यांसाठी ३ हजार कंत्राटी पोलिसांची भरती केली जाणार आहे. मुंबई पोलिस दलात १० हजार पदे रिक्त असल्याने दैनंदिन कामकाजासाठी मनुष्यबळ अपुरे पडत आहे. सणासुदीच्या काळात बंदोबस्तासाठी अतिरिक्त मनुष्यबळ लागते.




त्यामुळे हा निर्णय घेतल्याचे गृह विभागाकडून सांगण्यात आले. यासाठी गृह विभाग महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाला दरमहा ८ कोटी ३५ लाख १२ हजार रुपये देणार आहे. वर्षभरासाठी १०० कोटींहून अधिक रक्कम अदा केली जाणार आहे. पोलिस दल, तहसीलदार अशी महत्त्वाची पदे आऊटसोर्सिंगद्वारा भरून सरकार चुकीचा पायंडा पाडत आहे. कंत्राटी पोलिस भरती करून भाजप सरकार महाराष्ट्राच्या सुरक्षेचे तीनतेरा वाजवीत आहे अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांसाठी अनेक कामगार हिताचे कायदे केले. अनेक कामगार नेत्यांनी कॉ. श्रीपाद अमृत डांगे, रोझा देशपांडे, कामगार नेते र. ग. कर्णिक, डॉ. शांती पटेल, डॉ. दत्ता सामंत आदींनी कामगारांना न्याय व हक्क मिळवून देण्याचे मोठे काम केले. संप, लढे यशस्वी केले. त्यामुळे कामगारांना अनेक फायदे मिळाले. वैतनिक रजा, सुट्या, बोनस, साप्ताहिक सुटी, आठ तास काम, इतर रजा, महिलांना अनेक सवलती, विमा योजना मिळाल्या. अर्थात यासाठी झगडावे लागले. आज कामगारांची परिस्थिती बिघडली आहे. १२-१२ तासांची नोकरी, सवलती मिळत नाहीत, आठवड्याची एकच सुटी, कायम नोकरीची हमी नाही, केव्हाही कामावरून कमी करण्याची धास्ती,

कमी वेतनात काम करून घेतले जाते,

भविष्यकालीन तरतूद नाही. आता तर कंत्राटी पद्धतीचे षड्यंत्र वापरले जात आहे. लष्कर व पोलिस ही संरक्षण क्षेत्रातील दोन महत्त्वाची अंगे पण तेथेही कंत्राटी पद्धत लागू करण्यात येत आहे. सरकारला यातील धोका कधी कळणार? कंत्राटी पद्धतीने नोकरभरती करण्याच्या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी तीव्र विरोध केला आहे. कंत्राटी भरती पद्धतीत आरक्षण मिळणार नाही. त्यामुळे ही भरती विविध घटकांवर अन्याय करणारी ठरेल. त्यामुळे सरकारने कंत्राटी भरतीऐवजी कायमस्वरूपी भरती करावी, अशी सूचना शरद पवार यांनी केली. पोलिस भरती ही ११ महिन्यांची असेल तर ११ महिन्यांनंतर ही मुले काय करणार, असा सवाल त्यांनी केला. राज्य सरकारने पोलिस खात्यासह सर्व महत्त्वाच्या खात्यातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. कंत्राटी भरतीविरोधात संभाजी ब्रिगेडने मंत्रालयात आंदोलन केले. संभाजी ब्रिगेड कामगार संघटनेने मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. राज्य सरकारच्या विविध खात्यांमध्ये लाखो पदे रिक्त आहेत पण कायमस्वरूपी भरती केली जात नाही. राज्यात प्रचंड बेरोजगारी असूनही हातांना काम मिळत नाही. त्यामुळे तरुणाईत प्रचंड असंतोष आहे. पुरेसे शिक्षण घेऊनही सुशिक्षित बेरोजगारांना

संधी मिळत नाही.

त्यामुळे त्यांची वयोमर्यादा वाढताना दिसते. कंत्राटी कामगारांना ना कायद्याचे संरक्षण ना भविष्यात रोजगाराची हमी. रस्त्याच्या कामाचे, नालासफाईचे कंत्राट दिले जाते. कंत्राट घेणा-या ठेकेदारामार्फत निकृष्ट दर्जाचे काम केले जाते. ज्यांना कंत्राट मिळते त्यांचे मात्र फावते. कंत्राटी कामगारांना अल्प वेतनात राबवून घेतले जाते. त्यांच्या नशिबात शारीरिक, मानसिक व आर्थिक पिळवणूकच अधिक आहे. कंत्राटी नोकरभरतीला सर्वच थरांतून जोरदार विरोध असतानाही सरकारने कंत्राटी नोकरभरतीची भूमिका सोडलेली नाही. मग ते सरकार केंद्रातील असो की राज्यातील. महाराष्ट्रात पोलिसच नव्हे तर डॉक्टरही कंत्राटी पद्धतीने भरती केले जाणार आहेत. एकीकडे बेरोजगारांची फौज वाढत असताना त्यांना शाश्वत नोक-या न देता अकरा महिन्यांपुरत्या कंत्राटी पद्धतीने नोक-या देणे म्हणजे त्यांच्या आयुष्याशी खेळ खेळणे होय. देशात बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. बेरोजगार तरुणांपुढे रोजगार मिळविण्याचेच आव्हान आहे. त्यामुळे नोकरी कंत्राटी आहे की कायमस्वरूपी याच्याशी आता त्यांना

काहीही देणे-घेणे उरलेले नाही.

उच्च शिक्षित तरुणही सरकारी कार्यालयांतील शिपायाच्या कनिष्ठ पदासाठीही मोठ्या संख्येने अर्ज करताना दिसत आहेत. अशा घटनांतून देशात गुणवत्तेला, शिक्षणाला काहीही महत्त्व उरले नसल्याचेच प्रकर्षाने आढळून येत आहे. देशातील वाढत्या बेरोजगारीवरचा जालीम उपाय म्हणून सरकार बेरोजगारांचे रोजगार मेळावे भरवून त्यात ठराविक तरुणांना रोजगार दिल्याची आकडेवारी जाहीर करीत आहे. मुळात बेरोजगारीच्या संकटावर मात करण्यासाठी सरकारने रोजगाराभिमुख लघुउद्योगांना, मनरेगाच्या कामांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्याची गरज आहे. औद्यागिक क्षेत्रात भरीव गुंतवणूक करण्याची अथवा परदेशी गुंतवणूक आणण्याची गरज आहे. केंद्रातील भाजप सरकारने दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते, परंतु ते उद्दिष्ट आजतागायत गाठता आलेले नाही. हे सारे पाहता बेरोजगारीच्या गंभीर समस्येवर कंत्राटी पद्धत ही तात्पुरती मलमपट्टी आहे. त्यातून ना बेरोजगारीचा प्रश्न सुटेल ना जनतेची कामे मार्गी लागतील! कंत्राटीकरण तरुणाईच्या मुळावर येण्याचीच शक्यता अधिक आहे.

# दलितांचा उद्धार हाच आमचा ध्यास!

डिप्रेस्ड क्लास मिशन स्थापना दिवस.

महाराष्ट्रात अनेक समजसुधारक होऊन गेले त्यांच्यापैकीच एक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होते. त्यांनी दलितांचा उद्धार आणि अस्पृश्यता निवारण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यांच्या हालअपेष्ठा आणि त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापन केली. अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य आयुष्यभर करेन असा निश्चय केल्यानंतर आणि भिंगारच्या कार्यक्रमानंतर ते मुंबईला गेले. त्याठिकाणी त्यांनी प्रार्थना समाजाचे पदाधिकारी व आपल्या सहकाऱ्यांबरोबर अस्पृश्यता निवारण करण्यावर सविस्तर चर्चा केली. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रार्थना समाजानेसुद्धा अस्पृश्यता निर्मूलनासाठी व अस्पृश्यांच्या उद्धरासाठी कार्य केले. मुंबई येथील एफ्लिन्स्टन रोड येथे डिप्रेस्ड क्लासची पहिली शाळा स्थापन करण्यात आली. डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून प्राथमिक व दुय्यम शाळा, वसतिगृहे, मोफत दवाखाने, उद्योग, इतर शाळा इत्यादी काम सुरू झाले. ज्ञानवर्धक माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत जरूर वाचा.... संपादक.

मिशनच्या कार्याचा व्याप वाढल्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे यांना कार्यकर्त्यांची आवश्यकता भासू लागली. त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यात तळमळ असणारे कार्यकर्ते शोधण्यास सुरुवात केली. ही सुरुवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली. त्यांची बहीण पनवेल येथे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होती. त्यांच्या बहिणीने नोकरीचा राजीनामा देऊन मिशनचे कार्य करण्यास सुरु केले. त्यांचे आई-वडीलही जमखंडी सोडून मुंबईला आले. त्यांनी आपल्या मुलांनी सुरु केलेल्या कार्यात भाग घेऊन अस्पृश्यता निवारण व दलितांच्या उद्धाराचे काम सुरु केले. त्यांच्या प्रयत्नामुळे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याची व्याप्ती वाढू लागली होती. महाराष्ट्राच्या बाहेरील प्रांतातही मिशनच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. दि.१८ ऑक्टोबर १९०९ रोजी डिप्रेस्ड क्लास मिशनचा तिसरा वर्धापन दिन मुंबईला टाऊन हॉलमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, सर नारायण चंदावरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले आदी मान्यवर उपस्थित होते. याचवेळी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनला दोन हजार रुपये देणगी जाहीर केली होती.

डिप्रेस्ड क्लास मिशनची शाळा व वसतिगृहे- मिशनने अनेक शाळा आणि वसतिगृहे सुरु केली होती. इ.स.१९१२मध्ये विठ्ठल रामजी शिंदे कायम वास्तव्यासाठी पुणे येथे आले. पुणे येथे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या चौदा ठिकाणी २३ शाळा, ५ वसतिगृहे आणि १२ इतर संस्था होत्या. मिशनचे पाच प्रचारक आणि शाळेत ५५ शिक्षक होते. पुणे शाखेचा अहवाल पाहून तुकोजी महाराज होळकरांनी महर्षी शिंदेंना वीस हजार रुपये देणगी दिली. पुणे येथील सात एकर जमीन पुणे नगर परिषदेने ९९ वर्षाच्या कराराने मिशनच्या स्वाधीन केली. या जागेच्या आसपास त्या काळात अस्पृश्य समाजाची भोकरवाडी नावाची वस्ती होती. यथे इ.स.१९२२मध्ये भव्य इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे नाव अहिल्या आश्रम असे ठेवण्यात आले. त्यांचे यश आणि त्यांनी सुरु केलेले सामाजिक कार्य काही लोकांना सहन झाले नाही. या लोकांनी अगदी खालच्या पातळीला जाऊन त्यांच्यावर आरोप केले. त्यांच्यावर चिखल फेकण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे इ.स.१९२३मध्ये त्यांनी कंटाळून डिप्रेस्ड क्लास मिशनचे दायित्व ते ज्या समाजासाठी कार्य करीत होते त्यांच्याकडे सोपवून मिशनच्या कार्यातून मुक्त झाले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म दि.२३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटक राज्यातील जमखंडी येथे झाला. त्यांचे वडील रामजी व आई यमुना हे कानडी भाषिक असून ते वारकरी पंथाचे होते. त्यांचा परिवार जमखंडी गावात प्रतिष्ठित होता, पण आर्थिकदृष्ट्या संपन्न नव्हता. साधारण आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्याकाळी बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. या प्रथेनुसार विठ्ठल शिंदे यांचे लग्न वयाच्या ९व्या वर्षी रुक्मिणी नावाच्या मुलीशी झाले. आई-वडील वारकरी असल्यामुळे त्यांच्यावर लहानपणापासून वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. त्यामुळे तेसुद्धा लहानपणापासून वारकरी संप्रदायाच्या भक्तिमार्गामध्ये रमले गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जमखंडी येथे पूर्ण झाले. वयाच्या १२व्या वर्षी इ.स.१८८५मध्ये इंग्रजी हायस्कूलच्या पहिल्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला. इयत्ता दुसरीत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि त्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. ही शिष्यवृत्ती मॅट्रिक होईपर्यंत चालू होती. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर लगेच त्यांना संस्थानांच्या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली होती. परंतु पुढे आणखी शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा असल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांनी गंगाराम मस्के यांच्या मदतीने पुणे येथे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. फर्ग्यूसन कॉलेजमध्ये त्यांना दर महिन्याला दहा रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. या शिष्यवृत्तीत शैक्षणिक खर्च भगिवणे त्यांना कठीण जात होते. पण तश्याही स्थितीत त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांचा मित्र विष्णुपंत देशपांडे यांच्या मदतीमुळे ते पहिल्या वर्षाची परीक्षा देऊ शकले. इ.स. १८९३- १८९८ या काळात विठ्ठल रामजी शिंदे यांनी फर्ग्यूसन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवर बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांना दरमहा २५ रुपये शिष्यवृत्ती दिली होती.

डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी या संस्थेची सर्वप्रथम स्थापना दि.१४ जून १९२८ रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृशांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केली होती. डिप्रेस्ड क्लासेसमधील उच्च शालेय विद्यार्थ्यांचा विशेष लाभ घेण्यासाठी मुंबई सरकारने पनवेल, ठाणे, नाशिक, पुणे आणि धारवाड येथील पाच वसतिगृहाची जागा मंजूर केली. दलितांचा उद्धार हाच आमचा ध्यास या ध्येयाने पुण्यातील नाना पेठ येथील दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाची ११७ वर्षे वाटचाल सुरू आहे. शोषित, पीडित आणि दलितांच्या विकासाचे ध्येय ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दि.१८ ऑक्टोबर १९०६ रोजी या संस्थेची स्थापना करून पुनरुज्जीवन केले होते. सुरुवातीला मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणांहून संस्थेचे कामकाज सुरू होते. मात्र १९०८मध्ये महर्षी शिंदे यांनी पुण्यात संस्थेचे मुख्यालय असेल, असा निर्णय घेतला. हे येथे उल्लेखनीय! !! डिप्रेस्ड क्लास मिशन स्थापना दिनाच्या मागासवर्गीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा!!

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड नं-२०, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-
९४२३७१४८८३.

# अर्थशास्त्र आणि वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न

मुरूड /महेंद्र आल्टे : समाज जागृती शिक्षण संस्था संचलित, संभाजी कॉलेज मुरुड, येथे दिनांक १७/१० /२०२३ रोजी महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभागाच्या वतीने अभ्यास मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख उद्घाटक म्हणून प्रा.डॉ. सुदाम वसंतराव पवार (अर्थशास्त्र विभागप्रमुख, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर) तसेच याच महाविद्यालयातील इंग्रजी विभागात कार्यरत असणारे प्रा. यमले टी.डी. उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत पिडगे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आलेल्या पाहुण्यांचा व अर्थशास्त्र आणि वाणिज्य अभ्यास मंडळातील सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलताना प्रा. यमले टी.डी. यांनी अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाचे महत्व स्पष्ट केले. डॉ. सुदाम पवार यांनीही अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाचे महत्त्व स्पष्ट करून, समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती जीवन जगत असताना त्याच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक वेळी अर्थशास्त्र व वाणिज्यच्या माध्यमातून तो आपले जीवन व्यतीत करत असतो असे मत व्यक्त केले. तसेच अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील वेगवेगळ्या संधींची आजच्या तरुण पिढीला माहिती दिली. जिद्द,चिकाटी व मेहनतीच्या जोरावर कुठलेही यश प्राप्त करता येऊ शकते हे वेगवेगळ्या उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून औद्योगिक कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे कारण ज्याच्याकडे कौशल्य आहे तो त्या कौशल्याच्या बळावर जगात स्वतःचे, स्वतःच्या आई- वडिलांचे तसेच गुरुजनांचे, महाविद्यालयाचे नाव एका उंचीवर नेऊ शकतो,असे प्रतिपादन त्यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ. अनंत पिडगे यांनी महाविद्यालयातील तरुणाने शिकत असताना विविध कौशल्य स्वतःमध्ये विकसित करावी असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ. अंबाड आर.एफ. यांनी केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय अर्थशास्त्र विभागातील प्रा. सूर्यवंशी.ए.व्ही. यांनी करून दिला. तर आभार वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी कु.करंजकर भाग्यश्री हिने मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी कु.श्रद्धा शिंदे हिने केले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. देशमुख पी.एस., प्रा.प्रल्हाद चौधरी , प्रा. निलेश क्षीरसागर, अर्थशास्त्र विभागातील प्रा.शैलेंद्र सुतार, हिंदी विभागातील प्रा. डॉ. आत्तार तहेसीनबी तसेच अर्थशास्त्र व वाणिज्य विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रिपाइच्या मुंबई प्रदेश कमेटीत उपाध्यक्षपदी रतन अस्वारे यांची नियुक्ती




मुंबई /प्रतिनिधि:- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या मुंबई प्रदेश कमेटी मध्ये उपाध्यक्ष पदी रतन स.अस्वारे यांची नियुक्त करण्यात आली. त्या मुळे उत्तर मध्ये मुंबईतील जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ह्या प्रसंगी जिल्ह्याचे कार्याध्यक्ष किसन रोकडे, सरचिटणीस रघुनाथ कांबळे, रोजगार आघाडीचे राज्य अध्यक्ष चंद्रकांतदादा जगताप, सरचिटणीस व मुंबई अध्यक्ष अमित तांबे, आकाश बागले, दीपक साळवी, जितेंद्र साळवी, रितेश घायवट आदि नेत्यांनी मुंबई अध्यक्ष पँथर सिद्धार्थभाई कासारे यांचे आभार मानले आहेत. वांद्रे पूर्व आठवले साहेब यांचे कार्यालय येथे दि.१४ ऑक्टॉबर रोजी रिपाई मुंबई प्रदेश अध्यक्ष पँथर सिद्धार्थभाई कासारे यांच्या अध्यक्षते खाली पदाचे नियुक्ती पत्रक देण्यात आले. ह्या वेळी मुंबईचे सरचिटणीस विवेक गोविंदराव पवार ह्यांनी सूत्रसंचालन केले, सदर प्रसंगी जिल्हा अध्यक्ष साधू कटके, प्रकाश कमळाकर जाधव (मेढेकर), सुनिल बोर्डे, गणेशन मुतूस्वामी रमेश पाईकराव, रेश्मा खान सह अन्य पदाधिकारी उपस्थिती होते. मुंबईतील पदांची नियुक्ती पत्रके पँथर रमेश घोक्षे, पँथर प्रा. अर्जुन माघाडे, पँथर आत्माराम बाविस्कर, पँथर शहाजी सावंत सह अन्य पँथर आणि इतर पदाधिकारी के.एस.गायकवाड, अलि अहमद खान, रमेश जोगदंड, आत्माराम वाघमारे, मोहनराव चव्हाण सह जवळपास ७० पदाधिकारी यांची विविध पदावर नियुक्ती करण्यात आली. रतन अस्वारे ह्यांच्या नियुक्ती मुळे त्यांना विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षावं होत आहे.

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील हिरकणी कक्षाचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर (जिमाका) : जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या महिला अभ्यांगत, तसेच महिला अधिकारी,कर्मचारी यांना आपल्या बाळाला स्तनपान करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी कक्षाची पाहणी करून तेथील सुविधांची माहिती घेतली. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, धाराशिवचे अपर पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, लातूर शहर महानगपालिका आयुक्त बाबासाहेबमनोहरे, निवासीउपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पहिल्या माळ्यावर उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षामध्ये लहान मुलांसाठी खेळणी, मुलांना व मातेला स्तनपान करण्यासाठी व आराम करण्यासाठी सोफा, पलंग, पेंटींग, सिलींग, मॅटींग, खेळणी, खुर्च्या, लहान डायनिंग टेबल इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अतिशय सुविधापूर्ण हिरकणी कक्ष तयार केल्याबद्दल उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचे अभिनंदन केले.



दुर्मिळ वृक्ष बियाणे बँकेला उपसभापती डॉ. गोऱ्हे यांची भेट

जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन शाखेने सुरु केलेल्या दुर्मिळ वृक्ष बियाणे बँकेला विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भेट दिली. सह्याद्री देवराई, द संस्कृती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या बियाणे बँकेची निर्मिती करण्यात आली आहे. या बियाणे बँकेत स्थानिक प्रजातीच्या ७५ दुर्मिळ वृक्षांच्या बियांचे संकलन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील हा एक अनोखा उपक्रम आहे. या माध्यमातून दरवर्षी सहा लाख वृक्षांची निर्मिती करण्याचे नियोजन असल्यची माहिती नगरपालिका प्रशासन शाखेचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांनी यावेळी दिली. दुर्मिळ वृक्ष बियाणे बँकेचा प्रस्ताव अतिशय कौतुकास्पद असून वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात येणारी वृक्ष लागवडीमध्ये अशा दुर्मिळ वृक्षांच्या लागवडीवर भर देण्यात यावा, असे श्रीमती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विज्ञान मंडळ उद्घाटन, पोस्टर्स स्पर्धा, बि.एस्सी. आणि बी.सी.ए.प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात संपन्न

लातूर :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विज्ञान मंडळ उद्घाटन, पोस्टर्स स्पर्धा, बि.एस्सी. आणि बी.सी.ए.प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. मल्लिकार्जुन झाडे, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, स्पर्धा परीक्षक डॉ. संतोष कुलकर्णी, डॉ. प्रकाश कुलाल, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. दीपक चाटे, प्रा. वनिता पाटील आणि बी.सी.ए. शाखा समन्वयक प्रा. सुप्रिया बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संगीत विभागातील प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले त्यानंतर दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विज्ञान मंडळ अध्यक्ष कु. प्रियंका जाधव, सचिव साईनाथ कुलकर्णी, उपाध्यक्ष कु. खरोसेकर प्रतिक्षा, सहसचिव कु. बिडवे श्रद्धा कोषाध्यक्ष कु. कमले अश्विनी, सदस्य योगेश वाघमारे, विश्वजीत गरड, कु. गायत्री सुर्यवंशी, कु. अनुष्का वडमीले, दुर्वांकुर शिंदगे, श्रीनिवास माडे, कु. तायबा शेख यांचा सत्कार करण्यात आला. पोस्टर स्पर्धमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विभागून कु. प्रतिक्षा खरोसेकर (भौतिकशास्त्र), कु. प्रियांका जाधव व कु. तायबा शेख (वनस्पतीशास्त्र), द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु. स्नेहा हेरकर व कु. प्राचिती नाबदे (गणित), तृतीय क्रमांकाचे पारितोषीक कु. ममता आपटे व कु. जान्हवी तिकांबरे, उत्तेजनार्थ पारितोषीक कु. प्रियांका चव्हाण, दुरवाकुर शिंदगे, साक्षी वाघमारे, कु. तेजस्विनी कुंभार



आणि साबा सौदागर आदि विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. डॉ दीपक चाटे, प्रा. सुप्रिया बिरादार यांनी केले. स्वागतपर मार्गदर्शन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, प्रमुख मार्गदर्शन प्रा. मल्लिकार्जुन झाडे, स्पर्धा परीक्षक मनोगत डॉ. संतोष कुलकर्णी यांनी महाविद्यालयातील विज्ञान व बी.सी.ए.च्या विद्यार्थ्यांना पुढील प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचा समारोप संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांनी केला तर सर्वाचे आभारपर मनोगत प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी व्यक्त केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. मंतोष स्वामी यांनी करून दिला तर सुत्रसंचलन डॉ. यु. व्ही. गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नेहा कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुजित हंडीबाग, डॉ. विनायक वाघमारे, डॉ. जितेंद्र देशमुख आणि विज्ञान विभाग व बी. सी.ए शाखेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी केशव घंटे, दत्ता पांचाळ, रघु शिंदे, बाबू येरुळे आणि भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले.

# पानगाव स्टेशनवर मिळणार रेल्वेला थांबा :- खासदार सुधाकर शृंगारे

### नुकत्याच झालेल्या विभागीय रेल्वे कार्यालय, पुणे इथे झालेल्या बैठकीनंतर खासदार सुधाकर शृंगारे यांचे मोठे यश

लातूर :- गेल्या अनेक दिवसांपासून रेणापूर तालुक्यासह माझ्या लातूर लोकसभा मतदारसंघातील नागरिकांसह मी रेल्वे गाडी क्र.१७६४९/१७६५० या हैद्राबाद - छत्रपती संभाजीनगर या रेल्वे गाडीस मौजे पानगाव, ता. रेणापूर येथे थांबा मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नास अखेर यश आले असून या पुढे रेल्वे गाडी क्र.१७६४९/१७६५० या हैद्राबाद - छत्रपती संभाजीनगर या रेल्वे गाडीस पानगाव येथे थांबा मिळणार असल्याचे परिपत्रक रेल्वे मंत्रालयाने काढले असून या पुढे पानगाव रेल्वे स्टेशनवर ही गाडी थांबणार असल्याचे खासदार सुधाकर जी शृंगारे यांनी सांगितले.

नुकत्याच काही दिवसांपूर्वी विभागीय रेल्वे कार्यालय, पुणे येथे झालेल्या बैठकीत सुद्धा लातुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वे गाडी क्र.१७६४९/१७६५० या हैद्राबाद - छत्रपती संभाजीनगर या रेल्वे गाडीस पानगाव येथे थांबा मिळणेबाबत तर रेल्वे गाडी क्र.२२१४४/२२१४३, २२१०७/२२१०८ मुंबई - बिदर, लातूर - मुंबई, रेल्वे गाडी क्र.१७६१३/१७६१४ नांदेड - पनवेल या या रेल्वेगाडीस लातूर तालुक्यातील मुरुड येथे थांबा मिळणेबाबत देखील खासदार सुधाकर शृंगारे यांनी मागणी केली आहे. तसेच विभागीय कार्यालय, पुणे येथे झालेल्या बैठकीत नुकतीच सुरु झालेली हरंगुळ - पुणे इंटरसिटी एक्सप्रेसचा थांबा हरंगुळ ऐवजी लातूर येथे करावा, लातूर रेल्वे स्टेशनवरील पिटलाईनच्या मंजुरीची कार्यवाही तत्काळ करून पिटलाईनला मान्यता देऊन पिटलाईन सुरु करावी, लातूर तालुक्यातील मुरुड हे व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे शहर आणि



बाजारपेठ असल्याने मुरुड येथे प्रत्येक रेल्वेस थांबा मिळणेबाबत ही खासदार श्री.सुधाकर जी शृंगारे यांनी विभागीय रेल्वे कार्यालय, पुणे येथे मागणी केली.

तसेच लातूर हून पुणे आणि मुंबई कडे उद्योग, व्यापार आणि शिक्षणाच्या कामानिमित्त जाणाऱ्या प्रवाशांची आणि नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणत असून लातूर हून पुणे आणि मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांसाठी नांदेड - पनवेल रेल्वे गाडी क्र.१७६१३/१७६१४, लातूर - मुंबई रेल्वे गाडी क्र. २२१०७/२२१०८, बिदर - मुंबई रेल्वे गाडी क्र. २२१४४/२२१४ या रेल्वे गाड्यांचे कोच वाढविण्याबाबतही खासदार सुधाकर शृंगारे यांनी आग्रहाची विभागीय रेल्वे कार्यालय, पुणे येथे झालेल्या बैठकीत केली.

या बैठकीनंतर अगदी २ दिवसांमध्येच रेल्वे गाडी क्र.१७६४९/१७६५० या हैद्राबाद - छत्रपती संभाजीनगर या रेल्वे गाडीस मौजे पानगाव, ता. रेणापूर येथे थांबा जाहीर झाला असल्यामुळे हे लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर जी शृंगारे यांचे मोठे यश मानले जात आहे.

विभागीय रेल्वे कार्यालय, पुणे येथे झालेल्या या बैठकीस सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीनिवास पाटील, मावळ लोकसभा मतदारसंघाची खासदार श्रीरंग जी आप्पा बारणे, राज्यसभा सदस्य सौ.वंदना ताई चव्हाण, सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार जयसिद्धेश्वर स्वामी जी, हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील जी माने, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सदाशिव आप लोखंडे, धाराशीव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री.रणजीतसिंह जी नाईक निंबाळकर, पश्चिम रेल्वेचे जनरल मॅनेजर नरेश लालवाणी, पुणे आणि सोलापूर रेल्वेचे उछ्च् यांच्यासह रेल्वेचे सर्व सदस्य, रेल्वेचे अधिकारी, नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## अंनिस च्या जादूटोणा विरोधी कायदा राज्यव्यापी जनसंवाद यात्रा

लातूर :- महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्याटण कायदा २०१३ अर्थात जादूटोणाविरोधी कायदा राज्यव्यापी जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने दिनांक १९ आणि २० ऑक्टोबर या दोन दिवसात जनजागरण व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्यव्यापी रथ यात्रेसोबत नंदिनी जाधव पुणे प्रशांत पोद्दार सातारा भगवान रणदिवे सातारा हे सोबत येणार आहेत गुरुवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ७.३० वाजता देशी केंद्र विद्यालय लातूर सकाळी १० वाजता महात्मा बसवेश्वर महाविद्यालय दुपारी १२:३० वाजता दयानंद विधी महाविद्यालय व दुपारी २.०० वाजता दयानंद कला महाविद्यालय जनसंवाद यात्रेच्या कार्यक्रम होणार आहेत तसेच शुक्रवार दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालय सकाळी ११:३० वाजता यशवंत विद्यालय दुपारी १.०० वाजता ज्ञानदीप अकादमी अहमदपूर येथे जनसंवाद यात्रेचे कार्यक्रम होणार आहेत लातूर व अहमदपूर येथील कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन प्रकाश घादगिने राज्य कार्यकारी सदस्य रमेश माने राज्य प्रशिक्षण विभाग ,वसंत टेंकाळे राज्य वैज्ञानिक जाणीव प्रकल्प, प्राध्यापक डॉक्टर कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, पंकज जयस्वाल ,प्राध्यापक एम.बी पठाण ,अहमदपूर येथील मेघराज गायकवाड ,डॉक्टर धीरज देशमुख ,उद्धव इप्पर, प्राध्यापक रत्नाकर नळेगावकर, आजहर बागवान ,चंद्रशेखर भालेराव ,आदींनी केले आहे.

## विलास सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सज्ञ

लातूर / प्रतिनिधी :-विलास सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम सन २०२३-२४ चे बॉयलर अग्निप्रदिपन चेअरमन वैशाली विलासराव देशमुख व सर्व संचालकांच्या उपस्थितीत महापूजा करून करण्यात आले. सुरू होत असलेला गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी कारखाना सज्ञ झाला आहे. त्यादृष्टीने हंगामासाठीची सर्व कामे पूर्ण झाली असून अधिकाधिक उस गाळपाचे उद्दिष्ट ठेवून हंगामाची तयारी केली आहे. यावेळी चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी शारदीय नवरात्रोत्सव आणि गळीत हंगाम यशस्वीतेसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. राज्याचे माजी वैदयकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखान्याची उभारणी झाली आहे. हा कारखाना चाचणी हंगामापासून यशस्वी वाटचाल करीत आहे. मंगळवार दि. १७ आक्टोबर २०२३
रोजी सकाळी ११.०० वाजता विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख व सर्व संचालकांच्या उपस्थितीत गळीत हंगाम सन २०२३-२४ चे कारखाना बॉयलर अग्निप्रदिपन व झेडएलडी प्रकल्पातील बॉयलरचे अग्निप्रदिपन करण्यात आले आहे.
यावेळी बोलताना कार्यकारी संचालक संजीव देसाई म्हणाले, यावर्षी मराठवाडा विशेषत: लातूर येथे पर्जन्य सरासरी पेक्षा खुपच कमी पडले आहे. यामूळे गतहंगामापेक्षा उसाची उपलब्धता कमी होणार आहे. पाऊस कमी असल्याने उसाची वाढ म्हणावी तशी झालेली नाही, ऊस चांगला वाढला तरच वजन आणि उतारा चांगला मिळतो.




ऊसाच्या कमी उपलब्धतेमूळे हंगाम कमी दिवसच चालेल असा अंदाज आहे.हंगाम किमान चार महिने किंवा त्यापेक्षा जास्त चालला तर ते कारखान्यांनाही फायदेशीर राहते. कारखाना आधुनिकीकरणाची कामे, अंतर्गत देखभाल व दुरूस्तीची कामे वेळेवर व दर्जेदार झाली आहेत. तांत्रीक कारणानेकारखाना बंद राहणार नाही याची दक्षता घेतली असून हंगामासाठी यंत्रणा सज्ञ झाली आहे. विलास कारखान्याने सर्वच हंगामात ऊसउत्पादकांचे ऊसबील, तोडणी ठेकेदारांची बीले वेळेवर दिली आहेत. यामुळे ऊसदरांची स्पर्धा पाहता आपण जास्तीत जास्त ऊस मिळवीण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे यावेळी बोलतांना त्यांनी सांगीतले. या प्रसंगी बोलताना व्हा. चेअरमन रविंद्र काळे म्हणाले, माजी मुख्यमंत्री आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने, सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैदयकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिणचे आमदार धीरज विलासराव देशमुख व चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने विलास सहकारी साखर कारखाना चांगल्या पध्दतीने वाटचाल करीत आहे. विलास कारखाना उभारणी अल्पकाळात, अल्पखर्चात झाली असून आज हा कारखाना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली नावारूपाला आला आहे असे सांगीतले. कार्यक्रमास व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, रंजित पाटील, गोविंद डुरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर आदीसह कार्यक्रमास खाते प्रमुख, विभाग प्रमुख, सर्व कर्मचारी तसेच तोडणी-वाहतुक व पुरक कामाचे ठेकेदार उपस्थित होते. प्रारंभी बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रमाची महापूजा संचालक गुरूनाथ गवळी व
सौ. ऊषा गवळी उभयतांच्या हस्ते व सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आली. संचालक गोंविद डूरे यांनी गळीत हंगामाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा देऊन आभार मानले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राहूल इंगळे पाटील यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE